ISSN-2278-5655
AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume-XIV, Issues- I Jan – Feb, 2025
OPEN ACCESS
Original Research Article

# बंजारामहिलांचे सबलीकरण आणि सद्यः स्थिती

* प्रा.डॉ. रमेश एम. भालेराव व ** प्रा. गोविंद पु. पवार

*प्राध्यापक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख, संशोधक विद्यार्थी, शारदा महाविद्यालय, परभणी.

** अर्थशास्त्र विभाग, मु.जे. महाविद्यालय, जळगाव

**प्रस्तावना (Introduction):**

बंजारा समाज हा भारतीय समाज व्यवस्थेतील चातुवर्णव्यवस्थेतीलभटकंती करणारा समाज म्हणून ओळखला जातो. हजारो वर्षेशहर, खेडी व इतर समाज व्यवस्थेपासून व अनेक सुखसोयींपासून वंचित असलेलाव भटकंती करणारा हा समाज होय. महत्वपूर्ण बाब म्हणजे आपलीसंस्कृती, रुढी, परंपरा व भाषा या समाजाने आजतागायत जपून ठेवल्या आहेत.बंजारा समाज भारतातील इतर समाजापेक्षा वेगळा व वैशिष्टयपूर्ण आहे.याचे मुख्य कारण म्हणजे संपूर्ण भारत देशात यांचा एकच पोषाख, एकच भाषा,केशभूषा, समान चालिरिती तसेच संस्कार व सण समारंभ दिसून येतात. तसेच त्यांचीन्याय पंचायत, नायक, कारभारी वलोकगीते या सर्वांतून एकवेगळी व वैशिष्ट्यपूर्ण संस्कृती आपणास पाहावयास मिळते. बंजारा समाज जेवढे वेगळे आणि वैशिष्ट्यपूर्ण आहे तेवढेच बंजारा समाजातील महिला या समाजाकरिता, कुटुंबाकरिता महत्वपूर्ण आहेत. बंजारा समाजामध्ये महिलांना विशेषव महत्वपूर्ण स्थानआहे.

**Copyright © 2025 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

दैनंदिन जीवन जगत असताना बंजारा महिला अगदी सहजतेने विविध भूमिका पार पाडत समाजाच्या आधारस्तंभ बनल्या आहेत. कधी प्रेमळ कन्या, तर कधी वात्सल्यपूर्ण माता, तर कधी सक्षम सहचारिणी अशी विविध नाती अत्यंत कुशलतेने आणि कोमलतेने त्या निभावत आहेत.असे असले तरी जगाच्या पाठीवर बऱ्याच ठिकाणी समाजाकडून त्यांच्याकडे दुर्लक्ष होताना दिसते. तसेच महिला मोठ्या प्रमाणात सामाजिक असमानता, अत्याचार, आर्थिक परावलंबित्व आणि अन्य सामाजिक अत्याचारांना बळी पडतात. या आधुनिक युगातही बरेच पुरुष वर्ग पुरुषप्रधान संस्कृतिचा अवलंबकरीत स्त्रीयांना आजुनही दुय्यम स्थान देत आले आहेत. ही समस्या लक्षात घेता स्वातंत्र्यप्राप्तीनंतर महिलांच्या विकासासाठी राज्यघटनेत विशेष अशी तरतूद करण्यात आली आहे.समाजात एकूण लोकसंख्येच्या निम्मे प्रमाण स्त्रियांचे आहे. स्वाभाविकच, कोणत्याहीसमाजाचा विकास महिला कल्याणावर आधारभूत असतो हे लक्षातघेऊन

ISSN–2278-5655

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Issues– I Jan – Feb, 2025

OPEN ACCESS

Original Research Article

शासनाने विविध कायदे,कार्यक्रम तयार करून त्यांची अंमलबजावणी करण्यास स्वातंत्र्यानंतर सुरवात केली.स्वातंत्र्योत्तर काळात पहिल्या पंचवार्षिक योजनेपासून महिलाविसाकडे शासनाने लक्ष देण्याचे ठरवले. तथापि स्वतंत्रपणे महिला विकासाकडे न पाहतासार्वत्रिक दुर्बल घटकांच्या कल्याणाचा एक भाग म्हणून याकडे पाहिले गेले. त्यादृष्टीने महिला वबालविकासाची कामे हाती घेणारे स्वयंसेवी प्रयत्न वृद्धींगत व्हावेत यासाठी १९५३ मध्ये केंद्रियसामाजिक विकास मंडळाची स्थापना करण्यात आली. अशारितीने दुसऱ्या पंचवार्षिक योजनेपासून महिला कल्याणाचा दृष्टीकोन स्वीकारण्यात आला आणि त्याचबरोबर महिलांचे शिक्षण, गर्भवती स्त्रिया व बालकांच्या आरोग्यात सुधारणा इ. सेवा उपलब्ध करण्यावर भर देण्यात आला. सहाव्या योजनेतमहिला कल्याणाच्या संकल्पनेत रूपांतर करण्यात आले. यात बहुआयामी दृष्टीकोनाचा अवलंब करून आरोग्य, शिक्षण आणि रोजगार या तीन मध्यवर्ती क्षेत्रांवर लक्ष केंद्रीत करण्यात आले. म्हणजेच स्त्रियांचा आर्थिक वसामाजिक दर्जा उंचावून त्यांना मुख्य प्रवाहात आणणाऱ्या अनेक विकास योजना स्वीकारण्यात आले. असे असले तरी बंजारा समाजातील स्त्रियांच्या सद्यःस्थितीत विशेष असे काही फरक दिसून येत नाही. आजुनही बंजारा समाजातील स्त्रिया अविकसित, बेरोजगार, गरीब, मागास आणि वंचित दिसून येतात. म्हणून बंजारा समाजातील स्त्रियांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणने गरजेचे आहे.

**महिलासबलीकरणाची व्याख्या(Definition) :**

“महिलांना अर्थकारणात, समाजकारणात पुरुषांच्या बरोबरीने आणून त्याना मानसिकदृष्ट्याव आर्थिकदृष्ट्या सदृढ करणे म्हणजे महिला सबलीकरण होय.”

**जागतिक बँक :**

“व्यक्तिना किंवा गटाना आपली पसंती ठरवण्याची व पसंती इस्ट त्या कृतिमध्ये आणि फलप्राप्तिमध्ये उतरवण्याची क्षमता वाढवण्याची प्रक्रिया म्हणजे सबलीकरण होय.”

**संशोधनाचेमहत्त्व ( Importance of the research ) :**

बंजारा समाजातील स्त्रिया अविकसित, बेरोजगार, मागास, निराधार,गरीब, पीडितआणि वंचित दिसून येतात. म्हणून बंजारा समाजातील स्त्रियांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणने गरजेचे आहे. मानवी व्यवहारांच्या सर्वच पातळीवर स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने संधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. महिलांना पुरुषांच्या बरोबरीने कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय स्तरातून समान संधी, स्थान व अधिकार देऊन महिलांचे सबलीकरण करणे आवश्यक आहे. स्त्री-पुरुष समानता, शिक्षण, आरोग्य, आर्थिक सुरक्षितता यांसारख्या मार्गांचा वापर करून महिला सबलीकरण करणे आवश्यक आहे. आर्थिकदृष्ट्या मागास, निराधारपीडित महिलांचे जीवनमान उंचवण्याच्या दृष्टिने, त्याना त्यांचा हक्क मिळवून देण्यास सहाय्यक ठरण्याच्या दृष्टिने, बंजारा समाजातील स्त्रियांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याच्या दृष्टिने या अध्ययनाच्या माध्यमातून मंथन केले जाणार आहे.

**संशोधनपद्धती ( Research methodology ) :**

प्रस्तुत अभ्यास हा दुय्यम साधन सामुग्रीचा आधार घेवुन पूर्ण करण्यात आला आहे. दुय्यम पद्धतीने तथ्य संकलन करून त्याचे विश्लेषण करण्यातआले आहे. दुय्यम स्त्रोतांमध्ये

ISSN–2278-5655

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Issues– I Jan – Feb, 2025

OPEN ACCESS Original Research Article

विविध संदर्भ ग्रंथ,शासकीय रेकॉर्डस व अहवाल, जनगणना,नियतकालिके, मासिके, अप्रकाशित शोधप्रबंध, इंटरनेट इत्यादींचा आधार घेण्यात आला आहे.

**संशोधनाचीउद्दिष्ट्ये ( Objectives of the research ) :**

प्रस्तुत अभ्यासाची उद्दिष्ट्ये हे पुढील प्रमाणे निश्चित करण्यात आलेली आहेत -

1) बंजारामहिलांचीसद्यः स्थिति जणूनघेणे.
2) बंजारा महिला सबलीकरणाची पार्श्वभूमी समजून घेणे.
3) महिलांच्या सामाजिक -आर्थिक समस्येचा अध्ययन करणे.
4) महिला सबलीकरणाची साधने अभ्यासणे.
5) भारत सरकारने महिला सबलीकरणासाठी राबवलेल्या योजनाअभ्यासणे.
6) महाराष्ट्र शासनाने महिला सबलीकरणासाठी राबवलेल्या योजनाअभ्यासणे.
7) महिला सबलीकरणासाठी शासनाचे विविध कायदे अभ्यासणे.

**महिलांच्या सामाजिक - आर्थिक समस्या आणि सद्यः स्थिति:**

सद्यः स्थितिमध्ये असलेल्या बंजारामहिलांच्या सामाजिक -आर्थिक समस्या आणि यापूर्वीच्या स्थितिमध्ये असलेल्या बंजारामहिलांच्या सामाजिक - आर्थिक समस्या या सारख्याच वाटतात कारण काळ उलटून गेला पणबंजारा महिलांच्या समस्या मात्र अद्याप सुटलेल्या नाहीत.त्यातील काही समस्या पुढील प्रमाणे-

**१) अल्प शिक्षणाची संधी :** बहुतांशी बंजारा स्त्रियायाअज्ञानी आणि निरक्षर असतात. कारणपालकांचा विशेषतः ग्रामीण भागांतील पालकांचा मुलींना घरकामच तर करायचे आहे, त्यांच्यावर घराच्या चार भिंतीबाहेर पडण्याची वेळ येईलचकशाला, असे म्हणून मुलींच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष करीत असतात.

**२) नोकऱ्यांच्या अल्प संधी:** उच्च शिक्षणाचा लाभ स्त्रियांना घेणे शक्य होत नसल्यानेस्त्रियांना नोकऱ्यां मिळविताना अनेक अडचणी येतात.बेकारीमुळेस्त्रियांनाकमी वेतनावर आणि मालकाने आपल्या मर्जीप्रमाणे घातलेल्या अटीनुसार नोकरीस्वीकारणे भाग पडते. परिणामी, स्त्रियांना बेरोजगारीसारख्या समस्येला सामोरे जावे लागते.

**३) लिंगभेद/स्त्री-पुरुष भेद :** स्त्री-पुरुष भेदामुळे स्त्रियांच्या शोषणाला मर्यादा राहिली नाही. केवळलिंगभेदामुळे त्यांच्या बाबतीत पक्षपात होतो. मुलांना मुलींपेक्षा जास्तप्राधान्य दिले जाते, हे आहार, शिक्षण आणि इतर जीवनावश्यक तरतुदीयांच्या संदर्भात मुलींना दिल्या जाणाऱ्या अल्पप्राधान्यावरुन दिसून येते.

**४) स्त्री-भ्रूणहत्या :** मुलांना मुलींपेक्षा जास्त प्राधान्य दिले जातेलिंगभेद केला जातो. स्त्री-पुरुष भेदामुळे स्त्रियांचे शोषण केले जाते. त्यातूनच स्त्री-भ्रूणहत्येसारखी समस्या दिसून येते. जन्माच्या आधीच मुलींची गर्भामध्ये हत्या केली जाते.

**५) स्वातंत्र्याचा अभाव :** स्त्रियांना पुरुषांप्रमाणे स्वातंत्र्य उपभोगता येत नाही हे नेहमीच निदर्शनास येते.स्त्रिया ह्या बालपणी आणि तरुणपणी पालकांवर, लग्नानंतर नव-यावरआणि वृध्दझाल्यावर मुलांवर अवलंबून असतात. स्वातंत्र्याच्या अशा अभावामुळे स्वतःची कुवत सिध्द करणेस्त्रियांना कठिन जाते.

ISSN–2278-5655
Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–XIV, Issues– I Jan – Feb, 2025
OPEN ACCESS Original Research Article

६) **स्त्रियांवर होणारे अन्याय:** स्त्रियांवरपुरुषांकडून अनेक प्रकारचे अन्याय केले जाते, त्यामध्येत्यांच्यावर शारीरिक व मानसिक अत्याचार केले जातात.हुंड्यासाठी मारहाण केली जाते. फालतू कारणांवरून काडीमोड दिला जातो. ॲसिडफेकले जाते.घरकामासाठीराबवून घेणे आणि दारूपिवून मारहाण करणे इ.अन्याय स्त्रियांवर पुरुषांकडून केले जाते.

७) **गरिबी :** निरक्षरता आणि बेरोजगारीमूळे स्त्रियांमध्ये गरीबी दिसून येते.गरीबीमूळे महिलांच्या अनेक आर्थिक-सामाजिक समस्यादिसून येतात.

८) **सामाजिक दुष्प्रथांचाअतिरेक:** भारतीय समाजामध्ये अनेक सामाजिक दुष्प्रथा आहेतत्यामध्ये स्त्री-भ्रूण हत्या, ॲसिडहल्ला, हुंड्यासाठी मारहाण ,खर्चिक विवाहसोहळे, बालविवाह, व्यसनाधीनता इ.स्त्रियांच्या समस्येची तीव्रता आणखी वाढवितात.

**महिला सबलीकरणाची साधने :**

महिला सबलीकरणाची साधने पुढील प्रमाणे सांगता येईल -

१) **आर्थिक स्वावलंबन :** महिलांचे सबलीकरण घडवून आणण्यामध्ये आर्थिक स्वावलंबनहा घटक महत्वपूर्ण आहे. स्त्रियांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देऊन त्यांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनविणेहे महिला सबलीकरणाचे साधन आहे. अन्याय, अत्याचार आणि शोषणातून मुक्ततेसाठी आर्थिकस्वावलंबन हा उत्तम मार्ग आहे. आर्थिक स्वावलंबनातुन महिला आपल्या सर्व समस्या सोडवू शकतात.

२) **साक्षरता :** महिलांचे सबलीकरण घडवून आणण्यामध्ये साक्षरता हे एक महत्वाचे साधन आहे.स्त्रियांचा मानसिक आणि बौद्धिक विकास घडवून आणण्यासाठी साक्षरता हे महत्वपूर्ण घटक आहे. स्त्रियांच्या आरोग्याचा प्रश्न, कुटूंब नियोजनाचाप्रश्न, आर्थिक प्रश्न सोडविण्यासाठी साक्षरता हे उपयुक्त माध्यम आहे म्हणून महिलांचे सबलीकरण करण्यासाठी स्त्री शिक्षणाला महत्त्वदेणे आवश्यक आहे.

३) **कायदे :** कायदयाने महिलांना संरक्षण मिळते. महिलांच्या सबलीकरणाच्या दृष्टीने काही महत्वपूर्ण कायदे करण्यात आले आहे. पुष्कळदा गरीब व अशिक्षित स्त्रियांना न्यायालयाच्या दरवाज्यापर्यंत पोहचता येत नाही किंवाबऱ्याचदा महिलांना कायदा माहित असूनही त्यांना त्याचा उपयोग होत नाही. जरकायदे माहितअसले तर कायदयाच्या माध्यमातून सुद्धा महिला सबलीकरण साधले जाते.

४) **प्रसार माध्यमे :** महिला सबलीकरण हे प्रसार माध्यमाद्वारे परिणामकारकपणे करु शकतो. प्रसार माध्यमांचा योग्य वापर करुन समाजामध्ये जागृती करुन, स्त्रियांविषयीच्या कल्याणकारी योजना, स्त्रियांचा आरोग्य,शिक्षण, शासनाच्यायोजना, धोरण लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रसार माध्यमांचा वापर करुन महिला सबलीकरण करणे शक्य आहे.

५) **आरक्षण :** आरक्षण हे महिला सबलीकरणाचे प्रभावी माध्यम ठरत आहे. सक्षम महिला ही राष्ट्रउभारणीच्या कार्यास मोठा हातभार लावू शकते. त्याकरिता शासनाने महिलांना ५० टक्के आरक्षणदिले आहे. महिला आरक्षणामुळे आज विविध पदावर महिला आपला हक्क बजावत आहे.

६) **राजकीय निर्णय प्रक्रियेत सहभाग :** राजकीय निर्णय प्रक्रियेमध्ये स्त्रियांचा सहभाग वाढविणे गरजेचे आहे. राजकीय निर्णय प्रक्रियेतमहिलांचासहभाग हवा तसा दिसत नाही राजकीय निर्णय प्रक्रियेत महिलांचा सहभाग वाढला तर महिलांच्याविकासाठी सरकारवर दबाव आणता येतो. तसेच महिलांवरहोणारे अन्याय, अत्याचारकमी करण्यासाठी प्रयत्न करता येतो.

७) **प्रशिक्षण** : स्त्रियांमध्ये जागृती निर्माण व्हावी, त्यांचा आत्मविश्वास वाढावा यासाठी त्यांना विशेषप्रशिक्षण देणे महत्त्वाचे आहे. प्रशिक्षणामुळे महिलांना आपले ज्ञान आणि कौशल्यवाढविण्याची संधी मिळते.

**भारत सरकारने महिला सबलीकरणासाठी राबवलेल्या योजना :**

०१) महिलांनाप्रशिक्षण व रोजगार सहाय्यता कार्यक्रम.
०२) नोकरी करणा-यामहिलांसाठी वस्तीगृह.
०३) महिला समृद्धी योजना.
०४) अल्पमुदतनिवासगृह.
०५) राष्ट्रीय महिला कोष.
०६) स्वाधार.
०७) स्वंयसिद्धा.
०८) नोरॉड.
०९) लैंगिक शोषण थांबविण्यासाठीपथदर्शी प्रकल्प.
१०) इंदिरा महिला योजना.

**महाराष्ट्र शासनामार्फत महिला सबलीकरणासाठी राबवलेल्या योजना :**

०१) अहिल्याबाई होळकर योजना.
०२) शासकिय महिलावस्तीगृह.
०३) इंदिरा गांधी मातृत्व सहकार्य योजना.
०४) निराश्रीत महिलांसाठी शासकिय संरक्षणगृह.
०५) नॅशनल मिशन फॉर एम्पॉवरमेंट ऑफ वुमन.
०६) एकात्मिक बाल संरक्षण योजना.
०७) निराश्रीत महिलांसाठी स्वंयसेवी संस्थांची आधारगृह.
०८) सबला.
०९) उज्वला.
१०) स्वाधार.
११) देवदासी पुनर्वसन योजना.
१२) सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजना.

**महिला सबलीकरणासाठी शासनाचे विविध कायदे:**

०१) हिंदू विवाह कायदा.
०२) अश्लीलता विरोधी कायदा.
०३) हुंडा प्रतिबंधक कायदा.
०४) कौटुंबिक न्यायालय कायदा.
०५) महिला संरक्षण कायदा.
०६) सतीप्रथा विरोधी कायदा.
०७) बालविवाह प्रतिबंधक कायदा.
०८) महिला आयोग स्थापना.
०९) गर्भलिंग चाचणी गुन्हा.
१०) छेडछाड करणे गुन्हा.
११) मुस्लीम महिलांसाठी कायदा.

**सारांश:**

बंजारा समाजातील स्त्रियांना विकासाच्यामुख्यप्रवाहात आणण्याच्यादृष्टिने अशा अध्ययनाच्या माध्यमातून मंथनकेलेजाणे आवश्यक आहे.बंजारा समाज मुळातच भटकंती करणारा असल्याने बंजारा समाजातील स्त्रियांना

ISSN–2278-5655

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Issues– I Jan – Feb, 2025

OPEN ACCESS Original Research Article

असलेल्या समस्या देखील तेवढ्याच भीषण आणि त्या अनुषंगने आहेत. बंजारा महिलांची समस्या जर समूळ संपवायच्या असतील तर त्याना शिक्षणाच्या प्रवाहात आणावे लागेल. शिक्षणामुळे बंजारा स्त्रियांचा मानसिक आणि बौद्धिक विकास घडून त्यांचे आर्थिक प्रश्न, सामाजिक प्रश्न, राजकीय प्रश्न,सांस्कृतिक प्रश्न, आरोग्याचा प्रश्न, कुटूंब नियोजनाचाप्रश्न, सोडविण्यासाठी साक्षरता हे उपयुक्त माध्यम आहे. म्हणून बंजारा महिलांचे सबलीकरण करण्यासाठी स्त्री शिक्षणाला महत्त्वदेणे आवश्यक आहे.केंद्र शासनाची योजना आणि राज्य शासनाची योजना लक्षात घेता या महिला सबलीकरणामध्ये महत्वपूर्ण आहेत. महिलांच्यासबलीकरणाच्या दृष्टीने काही महत्वपूर्ण कायदे शासनाकडून करण्यात आले आहेत. पुष्कळदा गरीब व अशिक्षित स्त्रियांना न्यायालयाच्या दरवाज्यापर्यंत पोहचता येत नाही किंवाबऱ्याचदा महिलांना कायदा माहित असूनही त्यांना त्याचा उपयोग होत नाही. जर महिलांनासर्व कायदे माहितअसले तर कायदयाच्या माध्यमातून महिला आपल्या सर्व समस्या सोडवू शकतात. या सबलीकरणाच्या मोहिमेद्वारे महिला सक्षम बनून काळावर मात करू शकतात.

**संदर्भग्रंथ ( Bibliography ) :**


०१) आढाव विलास (२०१०), 'महिला सबलीकरण', 'प्रौढ निरंतर शिक्षण व ज्ञानविस्तारविभाग, पुणे विद्यापीठ, पुणे, पृष्ठ क्र. २.

०२) रसाळ आर. जी. (१९९८), 'भारतीय अर्थव्यवस्थेतील स्त्रियांचे स्थान', 'योजना' वर्ष २५,पृष्ठ क्र. २.

०३) शिंदे सुनिल, (२००९), 'ग्रामीण महिलांच्या विकासात बचत गटांची भूमिका आणिमहत्त्व', 'योजना' अंक ४, पृष्ठ क्र. २७.

०४) दासगुप्ता देसाई, गोखले (२००२), महिलांचे सबलीकरण, दारिद्र्य निर्मूलन वस्वयंसहाय्यगट, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, पुणे, पृष्ठ क्र. ६२.

०५) महिला बालविकास योजना, निर्देशिका, महाराष्ट्र शासन, यशवंतराव चव्हाण विकास प्रकाशन प्रबोधिनी, पुणे, पृ. क्र. २३ ते २६

०६) महिला बालविकास विभाग, माहिती पुस्तिका (२०१२-१३), महाराष्ट्र राज्य, पुणे पृ. क्र.३८-४०

०७) दिव्य मराठी, 'हेच का सबलीकरण' रविवार विशेष पुरवणी, २५ नोव्हेंबर २०१२.

०८) अर्थविचार : मराठवाडाअर्थशास्त्र परिषदजर्नल, जानेवारी२०१६

०९)Census of India, District census handbook Jalgaon, Maharashtra, 2011.

१०) https://shodhganga.inflibnet.ac.in

११) https://www.bookganga.com


*Cite This Article: प्रा. डॉ. भालेराव र. एम. व प्रा. पवार गो. पु. (2025).* **बंजारा महिलांचे सबलीकरण आणि सद्यः स्थिती.** In Aarhat Multidisciplinary International Education Research Journal: Vol. XIV (Number I, pp. 116–121).